# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 24/04/2021 (शनिवार)
(सकाळ)

---

### घरफोडी

पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 20 कि.मी अंतरावर मालेवाडा येथे दि. 23/04/2021 चे 01.00 वा. ते 07.00 वा. फिर्यादी नामे– अनिल मोतीराम गावंडे वय 47 वर्षे रा. मालेवाडा ता. भिवापुर यांनी दि. 22/04/2021 चे रात्री 10.00 वा. आपले घरी टिव्ही मध्ये क्रिकेट पाहिले व नंतर मोबाईल पाहता पाहता रात्री 01.00 वा. दरम्यान झोपले. सकाळी 07.00 वा. त्यांच्या घरचा नौकर अरून तराडे याने घरी येवुन आवाज दिले, तेव्हा फिर्यादी हे झोपेतुन उठुन पाहिले असता त्यांच्या घराचे मागचे सिमेंटचे दाराचे कडी व कोंडा जवळील भाग तोडुन अज्ञात आरोपीने घरामध्ये प्रवेश करून, बेडरूम मधिल सामान अस्ताव्यस्त करून लोखंडी कपाटातील एका स्टीलच्या डब्यात ठेवलेले नगदी 30,000/–रू चोरून नेले व कपाटातील सोन्याचे दागिने चोरून नेल्याचा संशय आहे. फिर्यादी यांची पत्नी बाहेरगावी गेली आहे आल्यानंतर सोन्याच्या दागिण्याबाबत निच्छित सांगता येईल. तसेच घराशेजारी राहणारे बाळु मुरलीधर इंगोले यांचे सुद्धा घरी चोरी झाली आहे. त्यांचे घरातुन चोरी गेलेल्या मालाबाबत फिर्यादीला माहीती नाही.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा भगवानदास यादव मो. नं 94221155591हे करीत आहे.

### दुखापत

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 05 कि.मी अंतरावर खदान क्र. 4 कन्हान येथे दि. 23/04/2021 चे 17.00 वा. ते 17.30 वा. फिर्यादी नामे– भारत शामलाल कारके वय 25 वर्षे रा खदान नं 4 कन्हान हा आपल्या भाउजी सोबत खदान नं 4 डम्पींग यार्ड जवळ कोळसा व लोखंडाचे तुकडे उचलण्याकरीता गेला असता तेथे आरोपी क्र. 1) गणेश प्रजापती व 2) सोनु प्रजाप्रती दोन्ही रा. खदान नं 4 कन्हान हे सुध्दा कोळसा व लोखंडाचे तुकडे मातीच्या डम्पींग यार्ड मधुन वेचत होते. तेव्हा आरोपीने जमा केलेले लोखंडी तुकडे दिसत नसल्याने ते फिर्यादीला शक लावुन बोलत होते, की, ''तुम्ही माझे लोखंडी तुकडे घेतले'' याकारणावरुन फिर्यादी व आरोपी यांच्यात वाद झाला. यानंतर फिर्यादी व आरोपी हे आप–आपल्या घरी गेले. फिर्यादी हा घरुन झोपुन उटला व अनुप तिवारी याचे घरासमोरुन फिर्यादी जात असता आरोपीतांनी संगणनत करुन फिर्यादीला शिवीगाळ करुन ''तु सबेरे हमारे से डम्पींग यार्ड मे जादा की बात कर रहा था'' असे बोलुन गणेश प्रजापती याने फिर्यादीला लोखंडी सळाख सारख्या चापट वस्तुने डोक्यावर मारुन जखमी केले. तसेच आरोपीतांनी फिर्यादीला हातबुक्कीने मारहाण केली व शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504, 506, 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ श्री जोसेफ मोनं 8275871504 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर